# आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**कार्यालय:- शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, ४ था मजला,**
**सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**
**दुरध्वनी / फॅक्स- २२६२६००७**
**email: directorayurvedmaha@gmail.com**
**वेबसाईट -** www.ayurvedinstitute.com

## अपंगांची विशेष भरती मोहिम

आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील मुंबई, नागपूर व उस्मानाबाद येथील महाविद्यालये, रुग्णालये, प्रादेशिक कार्यालये व इतर कार्यालयात गट - क (वर्ग-३) ची अपंगांची खालील पदे भरण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यांत येत आहेत. जाहिरातीच्या शेवटी अर्जाचा नमुना तसेच अर्जासोबत जोडावयाच्या प्रवेश पत्राचा नमुना दिला आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | पदांची संख्या | समांतर आरक्षण | वेतनश्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ लिपीक | २ | अंशत: अंध/ अल्पदृष्टी (PS/LV) - १<br>अस्थिव्यंग - १ | वेतन बॅण्ड रु.५२००-२०२०० ग्रेडवेतन रु.२४००/- | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परिक्षा उत्तीर्ण.<br>२) मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| २ | लिपीक टंकलेखक | २ | अंशत: अंध / अल्पदृष्टी (PS/LV) - १<br>मूकबधीर (PD) - १ | वेतन बॅण्ड रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.१९००/- | १) एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण.<br>२) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. या अर्हतेचे शासकीय वाणिज्य परिक्षा प्रमाणपत्र आवश्यक. |
| ३ | प्रयोगशाळा सहाय्यक | १ | मुकबधिर (PD) - १ | वेतन बॅण्ड रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२०००/- | १) सायन्स विषय घेवून एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण. |

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

१) **वयोमर्यादा** :- उमेदवाराचे वय दिनांक २३ जुलै २००९ रोजी कमाल ४५ वर्षे असावे.

२) **इतर अर्हता :-** सा.प्र.वि. शासन निर्णय दिनाक १९.३.२००३ नुसार वरील पदांकरिता D.O.E.A.C.C.सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C.' किंवा 'O'स्तर किंवा 'A' स्तर किंवा 'B' स्तर किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील "MS-CIT" परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. नसल्यास, तसेच नियुक्तीनंतर २ वर्षात सदर अर्हता प्राप्त न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

३) अर्जदार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

४) इच्छुक उमेदवारांने विहित केलेल्या नमुन्यातच आपले परिपूर्ण अर्ज एकाच बाजूने टंकलिखित (ए-४ आकाराच्या कागदावर ) करुन पाकीटावर ठळक अक्षरात " ..................................." या पदासाठी अर्ज (रिकाम्या जागी पदाचे नांव लिहावे.) असे नमूद करावे. हे अर्ज **"आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, ४ था मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** या पत्त्यावर दिनाक **२३ जुलै २००९** रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहाचतील अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर पोस्टाने किंवा अन्य प्रकारे आलेले कोणतेही अर्ज अपात्र ठरविण्यांत येतील. तसेच एका पदासाठी केवळ एकच अर्ज करावा. एकापेक्षा जास्त पदाकरिता केवळ एकच अर्ज केल्यास अर्ज रद्द ठरविण्यांत येईल.

५) प्रयोगशाळा सहाय्यक पदांकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रुपये ४००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी रुपये २००/- चा व वरिष्ठ लिपीक व लिपीक टंकलेखक पदाकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रुपये ३००/-

व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी रुपये १५०/- परिक्षा शुल्क आकारण्यांत येईल. सदर परिक्षा शुल्काचा धनाकर्ष (डी.डी.) **"Director of Ayurved, Maharashtra State, Mumbai "** या नावाने **Payable at mumbai** असलेला अर्जासोबत जोडावा. अर्जासोबत विहित शुल्काचा धनाकर्ष न पाठविल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

" माजी सैनिकांनी अर्जासोबत परिक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही."

६) उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चा पत्ता असलेले व रुपये १०/- चे पोस्टाचे तिकीट लावलेले २८x १२ सें.मी.आकाराचे २ लिफाफे जोडणे आवश्यक आहे. (स्वत:चा पत्ता असलेला व रुपये १०/- चे पोस्टाचे तिकिट लावलेले लिफाफे जोडले नसल्यास उमेदवारास काहीही कळविले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.)

७) अर्जासोबत कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती जोडू नयेत. अर्जदारांना स्पर्धात्मक परिक्षेच्या निकालानंतर मूळ प्रमाणपत्रे पडताळणीसाठी बोलाविले जाईल. त्यावेळी आवश्यक कागदपत्रांच्या (लागू असलेल्या) मूळ प्रती व त्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील.

८) उमेदवाराचे अपंगत्व किमान ४० % असणे आवश्यक आहे व त्या संबंधीचे जिल्हा शल्यचिकित्सक /केंद्र/ राज्य शासनाने यासाठी स्थापन केलेली मंडळे यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

९) अंध उमेदवारांना लेखी परिक्षेच्या वेळी लेखनिकाची आवश्यकता असेल तर त्यांनी अर्जासोबत तसा वेगळा अर्ज करणे आवश्यक आहे. ऐनवेळी लेखनिकाची मागणी केल्यास विचार केला जाणार नाही. वैयक्तिक लेखनिक वापरण्यास परवानगी दिली जाणार नाही.

१०) उमेदवाराकडे जातीचे वैधता प्रमाणपत्र नसल्यास निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती दिल्यानंतर ६ महिन्याचे आंत जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

११) अर्जदारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१२) उमेदवाराने अलिकडील पासपोर्ट आकाराचे स्वत:चे छायाचित्र अर्जावर तसेच प्रवेशपत्रावर चिकटवावे व त्यावर उमेदवाराने स्वत:ची स्वाक्षरी करावी.

१३) परिक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी उमेदवाराने आपले प्रवेशपत्र बरोबर आणले पाहिजे. प्रवेशपत्र नसल्यास उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

१४) उमेदवारास परिक्षेसाठी / मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल, त्यासाठी प्रवासखर्च दिला जाणार नाही.

१५) अपूर्ण अर्ज, उमेदवाराची स्वाक्षरी नसलेले, फोटो नसलेले, अन्य त्रुटी असलेले व निर्धारित वेळेवर न पोहोचलेले अर्ज फेटाळण्यांत येतील. फेटाळलेल्या अर्जाबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. पोस्टाच्या दिरंगाईमुळे विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जासाठी कोणतीही जबाबदारी हे कार्यालय घेणार नाही.

१६) निवड झालेले उमेदवार आयुर्वेद संचालनालयाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्तीस अथवा बदलीस पात्र राहतील.

१७) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ च्या अटी व इतर शासन निर्णय वित्त विभाग, संकीर्ण - १०००/प्र.क्र.७०/सेवा-५, दिनांक ११.८.२००० नुसार विहित अटी लागू राहतील. विवाहित उमदवारांकडून याबाबतचे प्रतिज्ञापत्र मूळ प्रमाणपत्रे तपासणीच्या वेळी घेतले जाईल.

१८) (अ) वरिष्ठ लिपीक पदाच्या लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यांत येईल. वरिष्ठ लिपीक पदाकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील. या पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नाही.

(ब) प्रयोगशाळा सहाय्यक व लिपीक टंकलेखक या पदांकरिता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यांत येईल. लेखी परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. लिपीक टंकलेखक पदासाठी मुलाखती घेण्यांत येणार नाहीत. प्रयोगशाळा सहाय्यक पदाकरिता मुलाखतीसाठी २५ गुण ठेवून एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवाराची निवड करुन गुणवत्तापात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यांत येईल.

१९) नियुक्ती / मुलाखतीसाठी उमेदवारांना लेखी परिक्षेत एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त होणे आवश्यक आहे.

२०) ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापूर्वीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच उमेदवारास त्याबाबत काहीही कळविण्यांत येणार नाही.

२१) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही वेळी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२२) शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखामार्फत वेळेत सादर करावेत किंवा ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

२३) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग , इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर तत्व) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी सन २००८-२००९ च्या उत्पन्नावर आधारित सक्षम प्राधिका-याचे ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर) उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

२४) पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण यात बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकारी मा. संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे स्वत:कडे राखून ठेवीत आहेत. याबाबतीत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२५) नियुक्त केलेल्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर २००५ नुसार लागू करण्यात आलेली अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

२६) सदरील जाहिरात महाराष्ट्र शासनाची वेबसाईट www.maharashtra.gov.in व रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी, मुंबई यांची वेबसाईट www.ayurvedinstitute.comवर प्रसिध्द करण्यांत आली आहे.

२७) परिक्षेचा दिनांक / ठिकाण , निकालाच दिनांक व मुलाखतीचा दिनाक / ठिकाण याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ) परिक्षेची तारीख :- दिनांक १६ ऑगस्ट २००९ वेळ :- सकाळी ११.००

ठिकाण :- रा.आ.पोदार वैद्यक महविद्यालय, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - १८.

ज्या उमेदवारांना दिनांक १२ ऑगस्ट २००९ पर्यंत परिक्षेचे प्रवेशपत्र पोस्टाव्दारे प्राप्त होणार नाही त्यांनी दिनांक १३ व १४ ऑगस्ट २००९ रोजी या कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.

ब) परिक्षेचा निकाल :- www.ayurvedinstitute.com या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

क) मुलाखतीचा दिनांक :- (केवळ प्रयोगशाळा सहाय्यक या पदासाठी ) पात्र उमेदवारांना पत्राव्दारे कळविण्यांत येईल.

ड) मुलाखतीचे ठिकाण:- आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य , मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, ४ था मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

**महत्त्वाची सूचना :- उपरोक्त स्पर्धात्मक परिक्षेच्या निकालानंतर उमेदवारांना त्याची मूळ प्रमाणपत्र पडताळणीसाठी जेव्हा बोलाविण्यांत येईल, त्यावेळी मूळ प्रमाणपत्रावरुन उमेदवारास पात्र / अपात्र ठरविण्यांत येईल. नियुक्ती / मुलाखतीसाठी गुणवत्तेनुसार केवळ पात्र उमेदवारांनाच पत्राने कळविण्यांत येईल. तसेच एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल.**

**स्वाक्षरी**
**संचालक,**
**आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वतः स्वाक्षरी करणे. |
|---|

# अर्जाचा नमुना
## महाराष्ट्र शासन
## आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
## ....................................... या पदासाठी अर्ज

| अपंगत्वाचा प्रकार | अंशतः अंध / अल्पदृष्टी | मूकबधीर | अस्थिव्यंग |
|---|---|---|---|
| | | | |

१) संपूर्ण नांव :

| | | |
|---|---|---|
| आडनाव | स्वतःचे नांव | वडीलांचे /पतीचे नांव |

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :

पिनकोड दुरध्वनी क्र.एसटीडी कोडसह

३) जन्मदिनांक :

४) दिनांक २३ जुलै २००९ रोजीचे वय :- वर्ष महिना दिवस

५) राष्ट्रीयत्व :- अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे का ? विवाहित/ अविवाहित :-

६) ज्या प्रवर्गासाठी अर्ज करावयाचा आहे त्या ठिकाणी (✓ ) अशी खुण करावी. एकापेक्षा जास्त खुणा केल्यास अर्ज बाद केला जाईल.

| अ.जा. (SC) | अ.ज. (ST) | वि.जा.(अ) (VJ-A) | भ.ज.(ब) (NT-B) | भ.ज.(क) (NT-C) | भ.ज.(ड) (NT-D) | वि.मा.प्र. (SBC) | इ.मा.व. (OBC) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | बोर्डाचे / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण केलेल्या प रिक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

८)

| डी.डी. क्रमांक | दिनांक | रुपये | बँकेचे नाव |
|---|---|---|---|
| | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री./श्रीमती / कुमारी ............................................................ प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती पूर्णतः खरी असून प्रमाणपत्रे तपासणीत ती खोटी आढळल्यास मी निवडीसाठी / मुलाखतीसाठी पात्र राहणार नाही. तसेच माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यांत येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

# प्रवेश पत्र

हे प्रवेश पत्र (अ.क्र.४ वगळता) उमेदवाराने भरावे व अर्जासोबत पाठवावे.

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वतः स्वाक्षरी करणे. |
|---|

१. उमेदवाराचे नांव :-

२. संपूर्ण पत्ता :-

३. अर्ज केलेले पद :-

४. परीक्षा बैठक क्रमांक :- वेळ :- सकाळी ११.०० वाजता

परीक्षेचे ठिकाण :- रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी, मुंबई - १८ दिनांक :- १६ ऑगस्ट २००९

प्रशासन अधिकारी,
आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---